मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.७२१०५/९९ ✻ वर्ष २५ ✻ अंक ३०४ सातारा ✻ मंगळवार दि ३० जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

महायुतीत बार्गेनिंगची लढाई

शिंदेंच्या शिवसेनेचं मिशन १००; विधानसभा निवडणुकांसाठी रणनीती

मुंबई : लोकसभा निवडणुकानंतर आता विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. पावसाळ्यानंतर विधानसभा निवडणुकांची पडघम वाजू लागणार असून सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. त्यानुसार, काही मतदारसंघातून उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तबही केलं जात आहे. मात्र, यंदाची विधानसभा निवडणूक अधिक रंजक ठरणार आहे, कारण शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेली फूट. राज्यातील दोन प्रमुख पक्षातील फुटीनंतर होणारी ही पहिलीच विधानसभा निवडणूक असणार आहे. त्यात, महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना यंदा पाहायला मिळणार आहे. त्यामुळे, महायुतीमधील कोणते पक्ष किती जागा लढणार, आणि महाविकास आघाडीतील कोणते पक्ष किती जागा लढणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, सर्वच पक्षांकडून आपली बार्गेनिंग पॉवर वाढविण्याचं काम सुरू आहे. त्यातच, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना १०० जागांवर निवडणुका लढवण्याची तयारी करत आहे.

महायुतीमध्ये अद्यापही जागावाटपाबाबत कुठलाही निर्णय झालेला नाही. मात्र, शिवसेना शिंदे गटाने १०० जागांसाठी कंबर कसल्याची माहिती आहे. त्यादृष्टीने उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. महायुतीमध्ये भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट एकत्रित आहेत. त्यामुळे, या तिन्ही पक्षांमध्ये जागावाटप होईल, त्यात भाजपचे सर्वाधिक आमदार असल्याने भाजप सर्वाधिक जागा लढवेल, त्यानंतर शिवसेना शिंदे गट व तिसऱ्या क्रमांकावर अजित पवारांची राष्ट्रवादी जागा लढवू शकते. मात्र, शिवसेना शिंदे गट व आम्हाला समसमान जागा देण्यात याव्यात, अशी मागणीच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी जाहीरपणे केली होती. त्यामुळे, जागावाटपाची अडचण कशी दूर होणार हा खरा प्रश्न आहे.

एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेकडून राज्यातील १०० विधानसभा मतदारसंघात आढावा घेतला जात आहे. एकनाथ शिंदेंनी विधानसभा मतदारसंघातील निरीक्षकांची यादीच जाहीर केली असून निरीक्षकांना संबंधित विधानसभा मतदारसंघात पाठवण्यात आले आहे. त्यानुसार, पक्षाचे पदाधिकारी सध्या मतदारसंघात जाऊन चाखाचोळा घेत आहेत. शिवसेना पदाधिकारी व मंत्र्यांकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना याबाबतचा अहवाल देण्यात येईल. त्यानुसार, कोणत्या मतदारसंघात पक्षाचं स्थान बळकट आहे, उमेदवाराला पसंती आहे याची माहिती होईल. त्यानंतर, अंतिम निर्णय होणार आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी भाजप नेते व गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. या भेटीत जागावाटपावर चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, भाजपकडून १५० जागांवर दावा केला जात आहे, आता शिंदे गटाकडून १०० जागांवर चाचपणी सुरू असून १०० जागा लढवण्याचा दावा केला जात आहे. शिवसेनेकडून महायुतीत दबावतंत्राचं राजकारण केलं जात असल्याने, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला किती जागा मिळणार हाही प्रश्नच आहे.

राज्यातील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील निकालानंतर राजकीय समीकरणे बदलली. २०१९ मध्ये शिवसेनेला ६५ जागांवर विजय मिळाला होता. त्यावेळी, शिवसेनेनं १२७ जागांवर निवडणूक लढवली होती. मात्र, एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे यांची शिवसेना एकत्र होती. त्यामुळेच, शिवसेनेनं जिंकलेल्या ६५ जागा व दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या ५६ जागांवर शिवसेना शिंदे गटाची नजर आहे. त्यातूनच, महायुतीत १०० जागांचा प्रस्ताव शिवसेनेकडून ठेवला जाणार असल्याचे समजते.

सद्यस्थितीत कोणाकडे किती आमदार

महायुती सरकारमध्ये भाजप हाच सर्वात मोठा पक्ष आहे. महायुतीमधील भाजप पक्षाकडे १०५ आमदार आहेत. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे ४२ आमदारांचे संख्याबळ आहे. पण, मुख्यमंत्री असलेल्या शिवसेना शिंदे गटाकडे ४० आमदारांची संख्या आहे. त्यामुळे, आमदारांच्य संख्येचा विचार केल्यस शिंदेंचा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर आहे. महायुतीला सत्ता स्थापनेसाठी १४४ जागांवर विजय मिळवावा लागणार आहे. त्यामुळे, हा मॅजिक फिगर गाठण्यासाठी महायुतीत कोणत्या पक्षाला किती जागांवर संधी मिळते हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईल.

कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५ हजार अनुदान

मुंबई : शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेप्रमाणे प्रति हेक्टरी ५ हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय आज कृषी विभागाने घेतला असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे. सन २०२३ मध्ये बहुतांश भागात पावसाचे प्रमाण कमी त्याचबरोबर कापूस व सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र, महायुती सरकारने या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याच्या निर्णयाची घोषणा लोकसभा निवडणुकीच्या आधीच केली होती. त्याचबरोबर त्याची अधिकृत घोषणा नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पातही करण्यात आली होती. त्यानुसार, आज शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यामुळे, लवकरच शासनाच्या घोषणेप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल.

राज्य सरकारच्या या निर्णयाची कृषी विभागाने कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात तातडीने अंमलबजावणी केली आहे. राज्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना किमान १००० रुपये तर २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपये या प्रमाणे अर्थसहाय्य देण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एकूण १५४८ कोटी ३४ लाख रुपये इतका तर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६ कोटी ३४ लाख रुपये असा एकूण ४१९२ कोटी ६८ लाख रुपये इतक्या निधी खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सदर अनुदानासाठी ई पीक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी केलेले शेतकरी अनुदानास पात्र ठरणार असून, डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या संलग्न बँक खात्यात ही रक्कम वर्ग केली जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यात मागील वर्षी आर्थिक नुकसान सहन करावे लागलेल्या लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून, महायुती सरकारने आपला शब्द पाळला आहे. या निर्णयासह तातडीने निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

लोणावळ्यात २६ पर्यटकांवर गुन्हे

प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केल्याप्रकरणी कारवाई

लोणावळा : जीव धोक्यात घालून सहारा पूल परिसरातील धबधब्याच्या परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या २६ पर्यटकांविरुद्ध लोणावळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भुशी धरण परिसरातील धबधब्यात एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेल्याची घटना नुकतीच घडली. वर्षाविहारासाठी पुणे-मुंबईसह राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पर्यटक येतात. अनेक पर्यटक जीव धोक्यात घालून हुल्लडबाजी करतात. धबधब्याच्या परिसरात मोबाइल कॅमेऱ्याद्वारे छायाचित्र काढतात.

धबधब्याच्या प्रवाहात पर्यटक वाहून गेल्याच्या घटना घडल्याने जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी हुल्लडबाजी करून जीव धोक्यात घालणाऱ्या पर्यटकांविरुद्ध कारवाईचा आदेश पोलिसांना दिला आहे. लोणावळा, खंडाळा परिसरासह जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करून लोणावळ्यातील सहारा पुलासमोरील धबधब्याच्या परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या चार वेगवेगळ्या गटांतील २६ पर्यटक तरुणांविरुद्ध लोणावळा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला. प्रतिबंधात्मक आदेश भंग केल्याप्रकरणी भारतीय न्यायसंहिता २०२३ कलम २२३ अन्वये रविवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल करण्यात आलेले पर्यटक तरुण मुंबई, मावळ, मुळशी, शिक्रापूर, शिरूर, चाकण, खेड, पुणे शहर परिसरातील आहेत. याबाबत पोलीस नाईक हनुमंत शिंदे आणि रईस मुलाणी यांनी स्वतंत्र फिर्याद दाखल केल्या असून, पोलीस निरीक्षक सुहास जगताप तपास करत आहेत.

भिडे आणि शिवणे पूल पुन्हा पाण्याखाली

पुणे : खडकवासला धरण साखळीत संततधार पाऊस सुरू असल्याने रविवारी रात्री मुठा नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले. धरणातून विसर्ग सुरू झाल्यानंतर सोमवारी सकाळी भिडे पूल आणि शिवणे पूल पुन्हा पाण्याखाली गेले आहेत.

धरण क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे रविवारी रात्रीनंतर विसर्ग सुरू करण्यात आला. नदीकाठच्या वसाहतींना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. सोमवारी सकाळी भिडे पूलावरुन पाणी वाहून लागल्याने पोलिसांनी पुलाच्या दोन्ही बाजूस तात्पुरते कठडे उभे करून पूल वाहतुकीस बंद केला.

भिडे पुलावरून जाणाऱ्या वाहनांनी डेक्कन जिमखाना, छत्रपती संभाजी पूलमार्गे इच्छितस्थळी जावे. पाणी ओसरल्यानंतर पूल वाहतुकीस खुला करून दिला जाईल, असे वाहतूक पोलिसांनी कळविले आहे.

नवीन महाबळेश्वरमध्ये दुर्गम भागात पोहोचण्यासाठी रोप-वे चा पर्याय

मुंबई : साताऱ्यातील प्रस्तावित नवीन महाबळेश्वर प्रकल्पात दुर्गम भागातील रहिवाशांना ये-जा करण्यासाठी आणि पर्यटकांना पर्यटन स्थळी जाणे सुलभ व्हावे यासाठी रोप वेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) नवीन महाबळेश्वराचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात येत असून त्या आराखड्यात रोप वे प्रस्तावित आहे. जेथे रस्ते बांधणे किंवा दळणवळणाचा इतर कोणताही पर्याय उपलब्ध नाही तिथे रोप वे प्रस्तावित करण्यात येणार आहे.

थंड हवेचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वरवरील पर्यटकांचा ताण कमी करण्यासाठी महाबळेश्वर शेजारीच नवीन महाबळेश्वर विकसित केले जाणार आहे. त्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमएसआरडीसीची करण्यावर भर असणार असल्याचे एमएसआरडीसीकडून सांगितले जात आहे. त्यानुसार रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन रस्ते, उपलब्ध रस्त्यांची दुरुस्ती अशा कामांना आराखड्यात प्राधान्य असणार आहे. त्याचवेळी जिथे रस्ते वा इतर कोणताही वाहतूक व्यवस्थेचा पर्यात उपलब्ध असणार नाही तिथे रोप वेचा पर्याय देण्यात येणार असल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

नवीन महाबळेश्वरमध्ये ज्या गावांचा समावेश सुरक्षित आणि अतिवेगाने पोहोचता यावे यासाठी काही पर्यटनस्थळीही भविष्यात रोप वेची सुविधा असणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. गावकऱ्यांना माफक दरात रोप वेची सुविधा कशी उपलब्ध होईल यादृष्टीनेही योग्य तो विचार केला जाणर असल्याचेही एमएसआरडीसीकडून सांगण्यात येत आहे. गड, किल्ले, पठार, मंदिर अशा अनेक ठिकाणी जाण्यासाठी रोप वेचा पर्याय नवीन महाबळेश्वरमध्ये असणार आहे.

उरण हत्याकांडातील आरोपी दाऊद शेखच्या मुसक्या आवळल्या

लोकेशन बदलणारा दाऊद कर्नाटकमध्ये सापळ्यात अडकलाच

नवी मुंबई : उरण हत्याकांडामधील आरोपी दाऊद शेखच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना अखेर यश आलं आहे. यशश्रीची हत्या झाल्यापासूनच दाऊद शेख फरार होता. यशश्रीच्या शरीराची विटंबना करून तिची हत्या करणारा नराधम दाऊद शेखला शोधण्यासाठी पोलिसांनी आपली संपूर्ण यंत्रणा कामाला लावली होती. अखेर कर्नाटकातून दाऊदला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आलं आहे. दाऊद शेख व्यतिरिक्त याप्रकरणात आणखी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. सीसीटीव्हीतून समोर आलेल्या फुटेमध्ये हत्या झाली त्या दिवशी यशश्री शिंदे हातात काळी छत्री घेऊन जाताना दिसत होती. तिच्या पाठोपाठ अवघ्या १० मिनिटांतच दाऊद शेख जाताना दिसला होता. उरण हत्याकांडातील मुख्य संशयित आरोपी दाऊद शेख याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नवी मुंबई पोलिसांनी दाऊद शेखला कर्नाटकमधून ताब्यात घेतले. यशश्री शिंदे हिची हत्या झाल्यापासून दाऊद फरार होता. दाऊद शेख याचा शोध घेण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी तब्बल सात पथकं तयार केली होती. अखेर चार दिवसांच्या शोध मोहिमेनंतर पोलिसांना दाऊदच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे. यशश्रीची हत्या झाल्यानंतर दाऊद फरार झाला होता. पोलीस त्याच्या मागावर होते, परंतु दाऊद शेख सातत्यानं लोकेशन बदलत होता. अखेर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दाऊदला कर्नाटकमध्ये पकडलं आहे.

ते नसतानाही पुण्यात धरण वाहिलं; पूरस्थितीवरुन राज ठाकरेंची अजित पवारांवर टीका

पुणे : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यात पावसामुळे पूरस्थिती निर्माण झालेल्या भागाची पाहणी करत नुकसानीचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत राज्य सरकारवर टीका केली. तसेच पाणी सोडताना लोकांना सांगायला हवं होतं. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडलं जाणार याची कल्पनाही लोकांना नव्हती. पुण्यातील परिस्थितीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष घातलं पाहिजे. पुण्याचे पालकमंत्री येथे नसतानाही पुण्यात धरण वाहिलं, अशी टीका राज ठाकरे यांनी पुण्यातील पूरस्थितीवर बोलताना राज्य सरकारवर आणि अजित पवार यांच्यावर केली.

धरणातील पाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात सोडलं जाणार याची कल्पनाही लोकांना नव्हती. त्यामुळे अनेक लोकांच्या घरात पाणी शिरलं. मला वाटतं की राज्य सरकारने या सर्व गोष्टीचा विचार करायला हवा. मुंबई बरबाद व्हायला वेळ लागला. मात्र, पुणे बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. गेले अनेक वर्ष हे मी सांगतो आहे त्याचच हे चित्र आहे. प्रत्येकवेळी राज्य सरकारकडून डेव्हलपमेंट प्लॅन येतो पण टाऊन प्लॅनिंग नावाची काही गोष्ट नसते, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

राज ठाकरे पुढे म्हणाले, शहरात किती गाड्या येत आहेत, किती विद्यार्थी येत आहेत. येणाऱ्या गाड्या पार्क कुठे होणार? लोक राहणार कुठे? या प्लॅनिंगसाठी काही उपायोजना कराव्या लागतात. मात्र, आपल्या कोणत्याही शहरात या उपायोजना राबवल्या जात नाहीत. आपल्याकडे जमीन दिसली की विकायची एवढाच उद्योग सुरु आहे. महानगरपालिकेतील काही अधिकारी आणि राज्य सरकारमधील काही अधिकारी आणि बिल्डर्स यांच्यामाध्यमातून अशी शहर बरबाद होत आहेत, असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

गेले दोन ते तीन वर्ष केंद्र सरकार महानगर पालिकांच्या निवडणुका घेत नाही. येथे कोणीही नगरसेवक नाही. विधानसभा निवडणुका लागतील तेव्हा आमदार येतील. मग नगरसेवक नसल्यामुळे जबाबदारी कोण घेणार? मग प्रशासनाशी कोणी बालायचं? याची सर्व जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यांनीही लोकांना धीर दिला पाहिजे. बाहेरच्या राज्यातून येणाऱ्या लोकांना तुम्ही फुकटची घर देत आहात. पण या राज्यातील लोक आहेत ते भीक मागत आहेत. मग याला काय सरकार चालवणं म्हणतात का?, असा सवाल राज ठाकरे यांनी केला.

आज पुणे शहर हे एक राहिलं नाही. त्याची पाच-पाच शहरं झाली आहेत. एक अधिकारी निलंबित करुन काही होत नाही. पुण्यातील परिस्थितीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनीही लक्ष घातलं पाहिजे. सध्या महाराष्ट्रात जे चालू आहे, ते अत्यंत दुर्देवी आहे. महाराष्ट्रात फक्त मतांसाठी राजकारण सुरु आहे. पण हे महाराष्ट्रासाठी चागलं लक्षण नाही. या सर्व गोष्टीचा विचार राजकारण्यांनी केला पाहिजे. मग तुमच्यात काय मतभेत असतील किंवा काय मतदान करुन घ्यायचं असेल ते करा. पण अशा प्रकारे जाती-जातीमध्ये विष कलवून जर मतदान मिळवत असताल तर महाराष्ट्राचं भविष्य चांगलं नाही, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

रस्ता चार पदरी आंबेघरचा ब्रिटिश कालीन पूल मात्र एकेरी

रोडवेज सोल्युशनच्या अनागोंदी कारभार : अनेक ठिकाणी राज्यमार्गाचे काम अर्धवटच

मेढा : महाड ते रहिमतपूर-विटा या प्रमुख राज्यमार्गाचे रोडवेज सोल्युशनने काम केले असून या रस्त्यावर राज्य शासनाने कोट्यावधी रुपये खर्च केले मात्र रोडवेज सोल्युशनच्या अनागोंदी कारभारामुळे या मार्गाचे काम अनेक ठिकाणी अर्धवट ठेवले आहे.तर मार्गावरील पुलांची कामे देखील केली नाहीत. यापैकीच केळघर नजीक आंबेघर येथील वेण्णा नदीवरील ब्रिटिशकालीन पूल हा अरुंद असल्याने या ठिकाणी नेहमीच अपघात होत आहेत. त्यामुळे रस्ता नवीन पूल मात्र जुनाच अशा परिस्थित या पुलाला भेगा पडल्याने आता धोकादायक बनला आहे.

महाड- महाबळेश्वर- मेढा -रहिमतपूर या राज्य मार्गासाठी राज्य सरकारने कोट्यावधी रुपयांचा निधीची तरतूद केली व हे काम रोडवेज सोल्युशनने घेतले मात्र रोडवेज सोल्युशनने अनेक ठिकाणी या रस्त्यांमध्ये फुलांची कामे अर्धवट ठेवली आहेत. त्यापैकीच केळघर नजीक आंबेघर येथील वेण्णा नदीवरील पूल.या पुलाचे काम रखडल्याने अनेक अपघात या पुलावर रस्त्याचा अंदाज न आल्याने आतापर्यंत झाले आहेत. तर आता या आंबेघरच्या ब्रिटिशकालीन पुलाला भेगा देखील या पावसाळ्यात पडल्या आहेत. त्यामुळे हा पूल वाहतुकीस धोकादायक बनला आहे.

नुकतीच या पुलाची पाहणी जिल्हा बँक संचालक ज्ञानदेव रांजणे, युवा नेते सागर धनावडे, नाना जांभळे, हरिभाऊ शेलार आदींनी केली. तरी तात्काळ ब्रिटिशकालीन हा पूल नव्याने बांधण्यात यावा अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

बांधकाम विभाग रोडवेज सोल्युशनवर मेहेरबान

रोडवेज सोल्युशनने अनेक ठिकाणी या महाड-विटा राज्यमार्गाची कामे अर्धवट ठेवली आहेत.काही ठिकाणी पुलांची बांधणी झालेली नाही. तसेच पूर्ण केलेल्या भागाचे देखभाल दुरुस्ती कडे रोडवेज सोल्युशन दुर्लक्ष करीत आहे.मात्र देखभाल दुरुस्तीची नियमित बिले बांधकाम भवनमधून निघत आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याला दोन्ही बाजूंना नाले काढणे आवश्यक असतानाही ते काढण्यात आलेले नाहीत. महाबळेश्वर घाटासह केळघर बाजारपेठेतील अनेक ठिकाणी शेवाळ्यामुळे लोक दुखापतग्रस्त होत आहेत. करोडो रुपयांची तरतूद असलेल्या या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे काम रोडवेज सोल्युशनने करून ही बांधकाम विभाग रोडवेज सोल्युशन वर मेहरबान असल्याचे दिसून येत आहे.

पुलाला दीडशे वर्षे पूर्ण

आंबेघर येथील रामजीबुवा मंदिराजवळ वेण्णा नदीवरील हा पूल ब्रिटिशकालीन आहे. आर्चर पद्धतीने कोरीव दगड, चुन्याच्या मिश्रणात बांधलेल्या या फुलाला दीडशे वर्ष पूर्ण झाली आहेत. तरी देखील अजूनही या पुलावरून रहदारी सुरू आहे. या पुलाच्या इतिहासात पहिल्यांदा जुलै २०२१ च्या महापुरात या पुलावर पाच फूट पाणी होते.

क्षेत्र महाबळेश्वर ते किल्ले प्रतापगड रोपवेसाठी तातडीने कार्यवाही करावी

खा. श्री. छ. उदयनराजे यांची मागणी

सातारा : प्रतापगड प्राधिकरण स्थापन केल्यानंतर धोम धरण ते क्षेत्र महाबळेश्वर ते किल्ले प्रतापगड असा दोन टप्प्यात रोप वे उभारण्यासाठी महाराष्ट्र सरकारचे ना हरकत प्रमाणपत्र त्वरित देण्या संबंधी कार्यवाही करावी.अशी मागणी खा.श्री. छ. उदयनराजे भोसले यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

दिल्ली येथे खा.उदयनराजे याच्या निवासस्थानी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी त्याची भेट घेतली तेंव्हा खा.श्री.छ.उदयनराजे यांनी महाराष्ट्राच्या विकास संदर्भात त्यांच्याकडे विविध मागण्या केल्या.तसेच राज्य सरकारने या मागण्या संदर्भात पाठपूरावा करावा असे ही नमूद केले.

या मागण्यांमध्ये त्यांनी, सुरूर पोलादपूर रस्त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्या संबंधीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या कडे दाखल केला असून त्या प्रस्तावाच्या संबंधित महाराष्ट्र सरकारने पाठपुरावा करून मंजूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी आग्रही मागणी केली.

शिव स्वराज्य सर्किट स्थापन महत्वाकांक्षी प्रकल्प आहे.त्याची कार्यवाही जलद गतीने करण्यासाठी केंद्र शासनाच्या पर्यटन व संस्कृतिक विभागाकडे पाठपुरावा करावा व त्यासंबंधी संयुक्त बैठक घेण्याची मागणी केली आहे.

या शिवाय सातारा शहर आणि तालुका पोलिस स्टेशनसाठी नवीन इमारत मंजूर करावी, जिहे कटापूर प्रकल्पासाठी तिसरी सुधारित प्रशासकीय मान्यता राज्य सरकारने त्वरित द्यावी, या मागण्यांसह महाबळेश्वर तालुक्यात मौजे सोळशी येथे ५.५ ते ६ टीएमसी धरण प्रकल्पास राज्य शासनाने त्वरित मान्यता द्यावी. यामुळे सातारा जिल्ह्यातील सातारा, खंडाळा, वाई, खटाव, कोरेगाव, फलटण, माण या तालुक्यातील अधिकचे क्षेत्र ओलिताखाली येईल, व या तालुक्यातील शेतकर्यांना याचा लाभ होईल असे सांगून पूर परिस्थितीत या धरणात साठा केल्यास कोयना धरणाच्या लाभ क्षेत्रातील अतिरिक्त पाणी साठा केल्यामुळे पूर परिस्थिती नियंत्रणात ठेवता येईल असे ही फडणवीस याच्याकडे केलेल्या मागणीत म्हटले आहे.

साताऱ्यात भंते दिपंकर यांचे आशीर्वाद घेऊन श्री उबाळे यांनी कार्यभार स्वीकारला

कोरेगाव : मानवी कल्याणाचा संदेश सर्वच जाती धर्माच्या गुरुंनी दिला आहे त्यांचा आदर्श घेऊन सातारा जिल्ह्याचे सुपुत्र व पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे राज्य उपाध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे यांनी साताऱ्यात महामानव घटनाकार डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांना आज विनम्र अभिवादन करून कार्यभार स्वीकारला आहे.

राजकारणात व धर्मकारण ही रथाची दोन चाकी आहेत .त्यामुळे धर्म व राजकारण हे वाटचाल करण्यासाठी उपयुक्त आहे. परंतु, त्याचा अतिरेक जर झाला तर काय घडू शकते? याचे ज्वलंत उदाहरण आपल्याकडे सर्वत्र पाहण्यास मिळत आहे . त्यामुळे दोन्हींना सीमारेषा ठेवून काम करण्यासाठीच श्री रमेश उबाळे यांनी सुरुवात केलेली आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष युवराज कांबळे, साहित्यिक अरुण जावळे, ऋषिकेश किनीकर , ओ.बी.सी. सेलचे संजय शिंदे, तालुकाध्यक्ष संजय कांबळे, तालुका उपाध्यक्ष रामा निकम, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष संतोष राठोड, मजदूर सेनेचे अध्यक्ष शेखर बनसोडे, मजदूर सेनेच्या शहराध्यक्ष लहू मोरे, अल्पसंख्यांक महिला जिल्हाध्यक्ष महिला आसमा शिकलगार ,मराठा सेल संघ जिल्हाध्यक्ष निलेश घाडगे, जिल्हा सल्लागार गुरव, शाहीर प्रकाश फरांदे, संदीप सप्रे, निखिल मोरे, विशाल कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

कराड अर्बन बँकेची १०७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

सभासदांना १०% लाभांश जाहीर

कराड : कराड अर्बन बँकेची १०७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ जुलैरोजी कराड येथील पंकज मल्टिपर्पज हॉल येथे बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष एरम यांचे अध्यक्षखाली पार पडली. यावेळी माजी अध्यक्ष व ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी, बँकेचे उपाध्यक्ष समीर जोशी, कार्यकारी अधिकारी सीए.दिलीप गुरव आणि सर्व संचालक तसेच व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल लाहोटी व सर्व सदस्यांसह सभासदांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात बँकेने एकूण व्यवसायाचा रू. ५००० कोटींचा ऐतिहासिक टप्पा पार करत एकूण व्यवसाय रू. ५१८६ कोटींवर पोहोचविला आहे. यामध्ये रू. ३२६१ कोटींच ठेवी तर रू. १९२४ कोटींचा कर्ज व्यवसाय आहे. बँकेला एकूण रु. ३७.११ कोटींचा ढोबळ तर, आयकर व तरतुदी वजा जाता रु. २४.१२ कोटींचा निव्वळ नफा झाला असून बँकेने आपली सक्षमता व सुदृढता राखली असलचे अध्यक्ष डॉ. सुभाष एरमांणी सांगितले.

बँकेने मागील वर्षीप्रमाणे वसुलीच्या कामकाजामध्ये कृती आराखड्याची अंमलबजावणी करत जुन्या आणि नवीन एन.पी.ए. खात्यांतून लक्षणीय वसूली करत असताना नक्त एन.पी.ए.चे प्रमाण ०.४४% इतके राखले आहे. सभासदांना १०% लाभांश देत असलची घोषणा यावेळी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष एरम यांनी केली. त्याच प्रमाणे सभासदांना मागील सर्वसाधारण सभेमध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करत ग्राहक सेवेमध्ये वाढ करून रिझर्व्ह बँकेकडून मोबाईल बँकिंगसाठीची परवानगी मिळविली आहे तरी सर्व सभासदांनी मोबाईल बँकिंग जास्तीत जास्त वापरून फायदा करून घ्यावा. येत्या काळात कराड अर्बन बँक सहकार क्षेत्रामध्ये अधिक सक्षम आणि सदृढ असेल असा विश्वास अध्क्ष डॉ. सुभाष एरम यांनी यावेळी व्यक्त केला.

बँकेच्या स्वभांडवलाचा पाया दिवसेंदिवस मजबूत व विस्तृत होत असून चालू वर्षांत भांडवल पर्याप्तता प्रमाण (सी.आर.ए.आर.) १६.१६% राखून आपली सक्षमता आणि सुदृढता आर्थिक प्रमाणकांवर सिद्ध केली आहे. एकूण ६२ शाखांपैकी २४ शाखांचा एन.पी.ए. शून्य टक्के आहे असून निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ०.४४% इतके राहिले आहे. बँकेच्या ६२ शाखांपैकी एकूण ४९ शाखांनी नफा मिळवला असून २६ शाखांना १ कोटींपेक्षा अधिक नफा झाला आहे. नव्याने सुरू केलेल्या १० शाखांनी ३-४ महिन्यांमध्ये सुमारे १०० कोटींचा व्यवसाय करून ग्राहक संख्येत लक्षणीय वाढ करून दिली आहे. यातून बँकेवर समाजाचा असणारा अढळ विश्वास अधोरेखित होतो असे मत माजी अध्यक्ष व ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी व्यक्त केले.

आरक्षण मर्यादा ८० टक्के करून सर्व आंदोलने थांबवा

मुंबई : महाराष्ट्रात सुरू असलेला मराठा विरुद्ध ओबीसी समजाच्या आरक्षणाचा संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. दोन्ही समाजाचे नेते एकमेकांवर टीका करत आहेत. यामुळे दोन समाजातील संघर्ष विकोपाला जात आहे. यामुळे कायदा सुव्यवस्था चिखळत आहे. समाजात व जाती-जातीत वाद होत आहेत . ही परिस्थीती टाळण्यासाठी आरक्षणाची मर्यादा वाढवून ती ८० टक्के करावी अशी मागणी जन संघर्ष समितीचे अध्यक्ष अँड रवींद्र रणसिंग यांनी सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर आर्थिक आणि शैक्षणिक मागास असलेल्या वर्गाला आरक्षणाची तरतूद करण्यात आली त्यामुळे त्यांना त्याचा लाभ होऊन त्यांची आर्थिक परिस्थीती सुधारली. सध्या देशात आरक्षणाची मर्यादा ५० टक्के आहे जर ती ८० टक्के केली तर त्याचा लाभ समाजातील इतर गरजू घटकांना होईल व त्यांचा आर्थिक आणि शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होईल. त्यासाठी मर्यादा वाढवणे गरजेचे आहे असे अँड रवींद्र रणसिंग यांनी यावेळी सांगितले.

आरक्षणामुळे जातीय सलोखा आणि सामाजिक समतोल राहतो त्यामुळे लवकरात लवकर जातीय जनगणाना देखिल करण्यात यावी. तरच देशातील येऊ घातलेली यादवी टळेल. या पार्श्वभूमीवर देशभर जनजागृती करण्यात येणार आहे असे त्यांनी सांगितले. यावेळीसंघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एका विरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जिल्हाधिकारी सातारा यांनी आपत्ती व्यवस्थापनाबाबत आदेश जारी केलेले असताना दि. २७ रोजी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास तुषार रामचंद्र उंबरकर रा. यवतेश्वर, ता. सातारा हे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करून त्यांची स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एमएच १४ झेड ३०५५ घेऊन भांबवली, ता. सातारा गावच्या हद्दीतील वजराई धबधबा या ठिकाणी फिरत असताना आढळून आले. अधिक तपास पोलीस हवालदार चव्हाण करीत आहेत.

अपघात प्रकरणी दुचाकी चालकावर गुन्हा

सातारा : अपघात करून गाडीचे नुकसान केल्याप्रकरणी दुचाकी चालका विरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २७ रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास अमर हिरामण येले रा. घाडगेवाडी, ता. फलटण यांनी त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र. एमएच ११ बीपी ७३८७ वेगात चालवून फॉर्च्युनर कार क्र. एमएच ११ डीए ०००३ ला जोरदार धडक दिली. अधिक तपास पोलीस नाईक मोरे करीत आहेत.

बंगाली सोने कारागिरांना पिस्तुलाच्या धाकाने लुबाडले

सातारा : दोन बंगाली सोन्याचे दागिने बनविणाऱ्या कारागीरांना कोयता आणि पिस्तुलचा धाक दाखवून दोन तरुणांनी सोन्याचे दागिने पळवून नेले आहेत. ही घटना वाई शहरात भर चौकात घडल्याने एकच खळबळ उडाली किती माल गेला याची खबर घेण्याचे काम रात्री उशिरा पर्यंत सुरु होते.याची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी बाळासाहेब भालचिम पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे व पोलीस कर्मचाऱ्यांनी यांनीं घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अधिक्षक समीर शेख, प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक शामसुंदर सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, गवळी, पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनेची माहिती घेतली. चोरट्यांचा कसून शोध घेण्याचे काम सुरू झाले आहे .

जनता सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र पुणे जिह्यात विस्तारणार : अमोल मोहिते

सातारा : सातारा शहरासह जिल्हयाची अर्थवाहिनी असणाऱ्या जनता सहकारी बँकेने रिझर्व्ह बँकेचे एफ.एस.डब्ल्यू.एम.चे सर्व निकष पूर्ण केले आहेत. त्यामुळे कार्यक्षेत्र विस्तार करण्यासाठी संचालक मंडळाने सुचवलेल्या पोटनियम दुरूस्तीस वार्षिक सभेने मंजुरी दिल्याने बँकेचे कार्यक्षेत्र सातारा जिल्ह्याबरोबरच संपूर्ण पुणे जिल्हा होणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन अमोल मोहिते यांनी दिली.

जनता सहकारी बँकेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवीन कला, वाणिज्य कॉलेज इमारत, कोटेश्वर मैदानासमोर, सातारा येथे बँकेचे चेअरमन अमोल उदयसिंह मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी बोलत होते, सभेस बँकेचे संचालक मंडळ सदस्य व सभासद उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी अहवाल सालात दिवगंत झालेले नागरिक, शहीद जवान, बँकेचे सभासद, खातेदार, पदाधिकारी, कर्मचारी व त्यांचे नातेवाईक, यांना संचालक मंडळाने श्रध्दांजली अर्पण केली. त्यानंतर ज्येष्ठ संचालक जयेंद्र चव्हाण यांनी प्रास्ताविक करुन सभेपुढील सर्व विषयांचे वाचन केले. यावेळी सर्व विषयांना सभासदांकडून एकमताने मंजुरी देण्यात आली. यात प्रामुख्याने बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी बँकेचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हा, संपूर्ण पुणे जिल्हा करण्याबाबत बँकेच्या पोटनियमात संचालक मंडळाने सुचवलेल्या दुरूस्तीस मंजुरी देण्यांत आली.

यावेळी संचालक मंडळाच्यावतीने सभासदांना माहिती देताना ज्येष्ठ संचालक श्री. चव्हाण यांनी, आर्थिक वर्ष २०२३ - २४ च्या वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या बँकेच्या सापंत्तिक स्थितीनुसार बँकेने रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार एफ.एस.डब्ल्यू.एम.चे म्हणजेच आर्थिकदृष्ट्या सक्षम, उत्तम व्यवस्थापनाचे सर्व निकष पूर्ण केल्याची माहिती दिली. या निकषांपैकी नेट एनपीए चे प्रमाण ३ टक्क्यांच्या आत राखणे, मागील आर्थिक वर्षांमध्ये सलग नफ्यात असणे, सीआरएआरचे प्रमाण १३ टक्क्यापेक्षा जास्त राखणे, हे महत्वाचे निकष पूर्ण केले आहेत. त्यामुळे बँकेस बँकेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार करणे तसेच मोबाईल बँकिंग सारख्या अत्याधुनिक ग्राहक सेवा सुविधा पुरवणे शक्य होणार आहे. याप्रमाणे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सहकार विभागाकडे आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यास संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे. बँकेने हिरक महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीयकृत, व्यापारी व खासगी बँकांपेक्षा कमी व्याजदराच्या म्हणजेच कॅशक्रेडीट तारणी ९ टक्के व सामान्य कर्ज ९.५० टक्के योजना सुरू केल्या असून आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मंडळाच्या योजना अंतर्गत देखील कर्ज वितरीत करत असून त्याचा जास्तीत जास्त सभासदांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी बँकेचे सभासद सुजित शेख यांनी बँकेने गत आर्थिक वर्षात उत्तम कामकाज करून जे यश प्राप्त केले आहे, ते सभासदांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. जेणेकरून सभासदांना बँकेची प्रगती समजेल, असे सांगून संचालक मंडळ सदस्य , सेवकांनी चांगले कामकाज केले त्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला. तसेच बँकेचे जेष्ठ सभासद वसंतराव माळी, शंकरराव निंबाळकर यांनी देखील बँकेच्या संचालकांनी व सेवकांनी केलेल्या चांगल्या कामकाजाबाबत अभिनंदनाचा ठराव मांडला. यावेळी बँकेचे सभासद तात्यासाहेब गणपत कांबळे यांनी सभासदांनी केलेल्या सूचनांचा विचार संचालक मंडळाने करावा असे सुचित केले. त्यावर जयेंद्र चव्हाण यांनी सभासदांच्या सूचनांचा संचालक मंडळ नेहमीच विचार करत आले आहे. सभासदांनी सूचना मांडण्यासाठी वार्षिक सभेची वाट पाहू नये. आपण इतर वेळी केलेल्या सूचनांचा देखील विचार संचालक मंडळ व चेअरमन निश्चित करतील, अशी ग्वाही दिली. वार्षिक सभेतील उपस्थित सभासदांचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल जठार यांनी बँकेच्या वतीने आभार मानले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, साताराासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

३ लाख फेरीवाल्यांचा मंत्रालयावर मोर्चा

मुंबई : सर्वोच्य न्यायालयाचे आदेश असताना फेरीवाला धोरण तयार करण्यास सरकार विलंब लावत असल्याने राज्यातील २०० पेक्षा जास्त फेरीवाला संघटना एकत्र येत असून मंत्रालयावर ३ लाख फेरीवाल्यांचा मोर्चा काढणार असल्याची माहिती जनवादी होकर्स सभा या संघटनेचे अध्यक्ष कोम्रेड के नारायण यांनी सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील २०० पेक्षा जास्त फेरीवाला संघटना फेरीवाला धोरण अंमलबजाणी साठी एकत्र येत आहेत. फेरीवाला कायदा २०१४ ची अंमलबजावणी करा म्हणून सर्वोच्य न्यायालयाने आदेश दिले आहेत. वेळोवेळी सर्वेक्षण करून अधिकृत व अनधिकृत फेरीवाले यांची संख्या शहर फेरीवाला समिती कडे आली आहे. आता पुन्हा सर्वेक्षण करून त्याची अंमलबजावणी करू असे काही सरकारी अधिकारी सांगत आहेत. मात्र खरे पाहता हप्ता बंद होईल या भीतीपोटी काही अधिकारी न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजाणी करत नाहीत.असा आरोप कोम्रेड के नारायण यांनी यावेळी केला.

करोडो रुपयांचा हप्ता पालिका,पोलिस,शासन व इतर संबंधित यंत्रणा महिन्याला गोळा करत आहे असा आरोप करत के नारायण म्हणाले, याचे सर्व पुरावे असणारी हप्ता डायरी कुणाकडे आहे याची आम्हाला माहिती होती. मात्र ती डायरी आता गायब केली असल्याची माहिती समोर येत असून त्या संबंधित अधिकाऱ्यांच्यात वाद सुरू आहेत. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहेच मात्र त्या अगोदर सर्वोच्य न्यायालयाचे फेरीवाला धोरण आदेश अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

शहरातून ४० टन गाळ, फ्लोटींग मटेरियल व प्लॅस्टीक कचरा उठाव

कोल्हापूर : गेली दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने पंचगंगा नदी पाणी पातळी कमी होत आहे. शिवाय शहर परिसरातील सकल भागात आलेले पुराचे पाणी कमी महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने स्वच्छता मोहीम हाती घेतली असून गेल्या दोन दिवसात ४० टन गाळ काढण्यात आला असून औषध फवारणी केली जात आहे.

मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने थोडी उसंत घेतली असल्याने पंचगंगा नदीची पाणी पातळी कमी होत आहे. त्यामुळे कोल्हापूर महापालिकेच्यावतीने शहरामध्ये पूर ओसणा-या भागामध्ये युध्दपातळीवर स्वच्छता व औषध फवारणी करण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेअंतर्गत कालपासून ४० टन गाळ, फ्लोटींग मटेरियल व प्लॅस्टीक कचरा उठाव करण्यात आला आहे. हि मोहिम पंचगंगा तालीम परिसर, व्हीनस कॉर्नर, दसरा चौक, लक्ष्मी नाराण मंदिर, जयंती नाला पंपीग स्टेशन, सीता कॉलनी, नाईक मळ, कारजगे मळा, रमणमळा मळा, जाधववाडी, कदमवाडी, कुंभार गल्ली, रिलायन्स मॉल, कामगार चाळ, दुधाळी गवत मंडई, सुतारावाडा या परिसरामध्ये राबविली जात आहे. यासाठी ३ जेसीबी, ६ आयवा डंपर, २ फायर फायटर, २ पाण्याचे टँकर, औषध फवारणीचे ५ टॅक्टर, धूर फवारणीची ९ मशिन व २० हॅन्ड पंप, ठाणे व नवी मंबई महापालिकेचे जेटींग कम वॉटर रिसायकल मशिनच्या सहाय्याने व महापालिकेच्या ३०० सफाई कर्मचा-यामार्फत राबविली जात आहे.

सेवाधाम वृध्दाश्रमाला जीवनावश्यक वस्तूंची भेट

किरण सोशल फाउंडेशनचा उपक्रम

पुणे : कै.सौ.किरण रवींद्र म्हैसुरकर यांच्या स्मरणार्थ नुकत्याच स्थापन झालेल्या किरण सोशल फाउंडेशनतर्फे सेवाधाम वृध्दाश्रमाला धान्य,तेल,तूप,ड्राय फ्रूटस,आंघोळीसाठी लागणाऱ्या बादल्या असे जीवनावश्यक साहित्य भेट देण्यात आले.

ज्येष्ठ स्वयंसेवक दीपक(काका) देशपांडे व सौ. ज्योती देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. सौ.अन्वेशा देशपांडे यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्यातर्फे संस्थेतील सर्वांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.फाउंडेशनचे सभासद अभिषेक बंजारे यांच्यातर्फे साखर,तेल, संतोष ठाकूर यांच्यातर्फे साफसफाईचे व इतर साहित्य, भूपेंद्र धायगुडे यांच्यातर्फे खाद्यतेल भेट देण्यात आले.यावेळेस संस्थेचे रवींद्र सरवदे,नीलेश कुलकर्णी,अतुल धुमाळ,चेतन पानसरे,अजिंक्य देशपांडे,सुशांत बरकडे,अमोल पाटील,रेणुका सरवदे,ऋचा देशपांडे,सुचित्रा कुलकर्णी,स्वप्ना म्हैसुरकर,भूपेंद्र धायगुडे,संतोष ठाकूर,अभिषेक बंजारे सर्व सभासद उपस्थित होते.सौ. पायगुडे यांनी आभार मानले.

'किरण सोशल फाऊंडेशन' या सामाजिक संस्थेची ही सुरवात असून याद्वारे समाजातील गरजू घटकांना,आपण काहीतरी समाजाचे देणे लागतो ,या हेतूने मदत करण्याचा प्रयत्न आहे.

सेवाधाम वृद्धाश्रम या संस्थेत अनेक वृध्द लोकांना आसरा मिळाला आहे. सौ. पायगुडे या अनेक वर्षे एकनिष्ठेने व तन्मयतेने हे आश्रम चालवत आहेत. त्यांची बांधिलकी बघून या कामात खारीचा वाटा उचलावा या हेतूनेच आम्ही हा उपक्रम राबविला.तरी ज्यांना शक्य असेल त्यांनी येथे भेट देऊन जमेल तशी मदत करावी.',असे आवाहन फाऊंडेशनच्या वतीने विपुल म्हैसूरकर यांनी केले.हा कार्यक्रम शनिवार,दि.२७ जुलै रोजी झाला.

बंडगार्डन व दौंडच्या विसर्गात वाढ उजनीची ५० टक्के कडे वाटचाल

टेंभुर्णी : काल दी २८ रोजी सायंकाळी चालू असलेल्या बंडगार्डन १३८३० व १८५०९ असा विसर्ग सुरू होता काल पानशेत व मुळशी धरण परिसरात पावसाचा जोर वाढल्याने खडकवासला धरणातून सोमवारी सकाळी पासून वाढ करून २५०३६ चा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आल्याने सोमवारी दि.२९ रोजी बंडगार्डन २५२१८च्या विसर्गात वाढ होऊन दौंड चा विसर्ग सोमवारी २१३२२ क्युसेक ने सुरू असल्याने विसर्गात वाढ होत आहे. तर उजनी धरणाची पाणी पातळीत होत असलेली वाढ सुरू असून सोमवार दि. २९ सायंकाळी ६ वाजता पाणीपातळी ४२.९ टक्के एकूण पाणीसाठा ८६.२१ टीएमसी तर उपयुक्त साठा २२.५५ टीएमसी झाला आहे.बंडगार्डन चा विसर्ग दौंड मध्ये १२ ते १४ तासात मिळणार असल्यामुळे उद्या मंगळवारी जवळपास ३० ते ३५ क्युसेक विसर्ग जमा होऊन सायंकाळी जवळपास ४७ टक्के पाणीपातळी होणार आहे. तर बुधवारी ५० टक्के ची पातळी पार करण्याचा अंदाज धरण व्यवस्थापन समितीचे सहाय्यक अभियंता प्रशांत माने यांनी सांगितले आहे.

उजनी धरणाची पाणी पातळी ४२.०९ टक्के झाली आहे. बुधवारी अर्धशतक (५० टक्के) पार करून तर उजनी शंभरी कडे वाटचाल करणार आहे.तर असाच विसर्ग कायम राहिला आणि धरण शंभर टक्के भरण्यासाठी पुणे,मावळ, भीमाशंकर, जुन्नर,लोणावळा या परिसरासह धरण आणखी मोठ्या पावसाची गरज असून भिमा खोऱ्यातील पाऊस कायम राहून उजनी शंभर टक्के भरण्याची आशा निर्माण झाल्या आहेत.

उजनी वर असलेल्या डावा उजवा कालवा, भीमा-सीना बोगदा,सीना-माढा उपसा सिंचन योजना,दहिगाव सिंचन योजना, जलविद्युत प्रकल्प,यासह अनेक योजनेतून जादा झालेले पाणी सोडण्यासाठी धरण ५० ते ८० च्या पुढे गेल्यावर धरण क्षेत्रात पडणारा पाऊस व दौंड मध्ये येणारा विसर्ग यांचा विचार करून नियोजन करण्यात येत असल्याची माहिती धरण व्यवस्थापन समितीचे सहाय्यक अभियंता प्रशांत माने यांनी दिली.

वरील धरणातून सोडण्यात आलेला विसर्ग

चिल्हेवाडी ८५५, चासकमान - ८६०,भामा असाखेड - ५१४५, कासार साई - ४००, पानशेत - १५१३६, खडकवासला - २५०४६ क्युसेक विसर्ग या सहा धरणातून सुरू आहे.

संविधान अमृत महोत्सवानिमित्त जागर यात्रा

मुंबई : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवा निमित्त येत्या ९ ऑगस्ट पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या महाड मधून चवदार तळ्याचा सत्याग्रह केला तेथून संविधान जागर यात्रा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जय भीम आर्मी (संविधान जागर यात्रा संयोजक) नितीन मोरे यांनी सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यात्रा संपूर्ण महाराष्ट्रतून जाणार असून या यात्रेद्वारे फुले - शाहू - आंबेडकर व भारताचे संविधान व त्यातील मौल्यवान विचार, मूलभूत तत्वे संविधानात असलेल्या भक्कम तरतूदी याबद्दल समाजात व्यापक जागृती करण्यात येणार आहे.

संविधान जागर यात्रेचे संयोजक व भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ऍड .वाल्मिक निकाळजे,

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सामाजिक संघटनेचे प्रमुख राजेंद्र गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन व आधार महिला कौशल विकास केंद्र मुंबई अध्यक्षा योजनाताई ठोकळे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष शरद कांबळे, अनुसूचित जाती मोर्चाचे मुंबई प्रदेश उपाध्यक्ष स्नेहाताई भालेराव,आकाश अंभोरे, नागसेन पुंडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील फुले, शाहु, आंबेडकरी चळवळीतील सुमारे २५० पक्ष, संघटना, संस्था, मंडळे यांनी एकत्रीत येऊन बैठकांद्वारे चिंतन करून संविधान जागर समिती स्थापन केली आहे. सत्याग्रह भूमी महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे येथुन सविधान जागर यात्रेची सुरुवात होणार असून यात्रेचा समारंभ केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह राज्यातील मान्यवर नेते आणि कोअर समितीचे प्रमुख सदस्य यांच्या उपस्थितीत ९ ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती दिनी सकाळी १० वा होणार आहे.

ही यात्रा कोकण भूमीतून संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खान्देश, (उत्तर महाराष्ट्र) मार्गे संठाणे जिल्हयातून चैत्यभूमी दादर मुंबई येथे ८ संप्टेबर २०२४ रोजी सकाळी येणार आहे. दादर येथे या यात्रेचा समारोप होणार असल्याची माहिती संयोजक नितीन मोरे यांनी यावेळी दिली.

माजी आमदार मालोजीराजे यांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी

कोल्हापूर : पंचगंगा नदीची पाणी पातळी वाढल्यामुळे कोल्हापूर शहरातील विविध भागात नागरी वस्तीत पाणी घुसले. यामुळे काही प्रमाणात महापुराची भीती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार मालोजीराजे यांनी विविध भागात जाऊन पाहणी केली. स्थलांतरित लोकांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या.

शाहूपुरी कुंभार गल्ली, गवत मंडई, उत्तरेश्वर पेठ, शुक्रवार पेठ, पंचगंगा तालीम, चित्रदुर्ग मठ, बापट कॅम्प, कदमवाडी, पोवार मळा, वागळे मळा, पाटोळे मळा, नाईक मळा, रमण मळा, न्यू पॅलेस एरिया, जाधव वाडी अशा विविध भागात भेटी दिल्या यावेळी स्थानिक माजी नगरसेवक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रेक्षणिय स्थळे बंद करण्याचे आदेश दिल्याने पर्यटकांकडुन कोणत्याही प्रकारचा टोल वसुल न करण्याचा निर्णय

महाबळेश्वर : महाबळेश्वर येथे अतिवृष्टी सुरू असल्याने खबरदरीचा उपाय म्हणुन सातारा जिल्हाधिकारी यांनी महाबळेश्वर व परीसरातील सर्व प्रेक्षणीस स्थळे ३० तारखे पर्यंत बंद ठेवण्याचा आदेशदिल्याने महाबळेश्वर येथील वन विभागाने या कालावधील पर्यटकांकडुन कोणत्याही प्रकारचा टोल न वसुल करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहीती महाबळेश्वर येथील वनक्षेत्रपाल गणेश महांगडे यांनी दिली

महाराष्ट्राचे नंदनवन म्हणुन महाबळेश्वर हे प्रसिध्द आहेत पुर्वी येथे केवळ हंगामात पर्यटक येत असे पावसाळ्यात पर्यटकांची रेलचेल फार कमी असते परंतु गेली काही वर्षे येथे वर्षा सहलीचे फॅड मोठया प्रमाणावर वाढल्याने येथे पावसाळ्यात देखिल पर्यटकांची आवक मोठया प्रमाणावर सुरू असते सध्या येथे पावसाळी पर्यटनाचा हंगाम सुरू आहे गेली आठवडा येथे अतिवृष्टी सुरू आहे या अतिवृष्टीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडु नये या साठी खबरदारीचा उपाय म्हणुन सातारा जिल्हाधिकारी जीतेंद्र डुडी यांनी ३० जुलै पर्यंत महाबळेश्वर व परीसरातील सर्व प्रेक्षणिय स्थळे बंद करण्याचे आदेश दिले आहेत जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशाची तातडीने वन विभागाने अंमलबजावणी सुरू केली आहे सर्वच पॉईंटवर बॅरीकेटस् लावुन प्रेक्षणिय स्थळे बंद करण्यात आली आहेत.

प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी येथे येणारे पर्यटकां कडुन वन विभाग प्रवेशकर गोळा करते तर वाहना कडुन प्रदुषण कर गोळा केला जातो जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशा नुसार महाबळेश्वर व परीसरातील सर्व प्रेक्षणिय स्थळे बंद करण्यात आली आहेत या शिवाय पर्यटकांना कोणतीही सुविधा वन विभागाकडुन दिली जात नाही त्या मुळे महाबळेश्वर येथे येणारे पर्यटकां कडुन कोणत्याही प्रकारचा टोल वसुल न करण्याचा निर्णय वन विभागाने घेतला असुन त्याची अंमलबजावणी दि २६ पासुन सुरू करण्यात आल्याची माहीती वन विभागाचे वनक्षेत्रपाल गणेश महांगडे यांनी दिली प्रेक्षणीय स्थळे बंद असली तरी पालिकेकडुन पर्यटकां कडुन प्रवेशकर व प्रदुषण कर वसुल करण्यात येत आहे.

कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक पाटील याचं निधन

कोल्हापूर : कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्हा सहकार बार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष तसंच कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक हिंदुराव पाटील यांचे आज आकस्मिक निधन झाले.

ड अशोक पाटील, हे मूळचे कागल तालुक्यातील बेलवळे गावचे रहिवासी आहेत. त्यांचे शिक्षण कोल्हापुरातील न्यू कॉलेज इथ तर कायद्याचे शिक्षण शहाजी लॉ कॉलेज येथे झालंय. कै रामराव इंगळे यांच्याकडे ज्युनिअर म्हणून वकिली व्यवसाय सुरू केला. त्यांनी सहकारच्या विशेष खटल्यांमध्ये प्राविण्य मिळवलंय. त्यांनी कोल्हापूर - सिंधुदुर्ग सहकार बारची स्थापन केली. त्यानंतर ते कोल्हापूर जिल्हा बारचे अध्यक्ष होते .त्यांनी सहकार आणि दिवाणी कोर्टामध्ये गेली पस्तीस वर्षे वकिली केली. आजरा, चंदगड आणि करवीर तालुक्यातील महत्त्वाच्या खटल्यांसह पुणे कमिशनर, विशेषतः निवडणूक विषयी खटले आणि इतर खटलेही त्यांनी चांगल्या प्रकारे चालवले आहेत.

कोरेगाव तालुक्यात खरीप पिक पेरणी १०१.५२%

कोरेगाव : कोरेगांव तालुक्यामध्ये २४ जुलै अखेर सरासरी ३७९.८० मिमी इतक्या पावसाची नोंद झाली असुन सरासरीच्या १२२% पावसाची नोंद झाली असल्याची माहिती कोरेगाव तालुका कृषी अधिकारी ज्ञानदेव जाधव यांनी दिली.

तालुक्यातील रहिमतपूर महसुल मंडलमध्ये सर्वाधिक ४५२ मिमी पावसाची नोंद झाली असुन सर्वात कमी कुमठे मंडलमध्ये २९८.६० मिमी इतकी पावसाची नोंद झालेली आहे. इतर मंडलमध्ये अनुक्रमे कोरेगांव ३४६ मिमी., शिरंबे ४५० मिमी., वाठार स्टे. ३६०.७० मिमी., वाठार कि. ४०८.६० मिमी., पिंपोडे ३२८ मिमी., सातारारोड ३७१.५० मिमी., किन्हई ३८९.५० मिमी. इतकी पावसाची नोंद झालेली आहे. एकंदरीत तालुक्यामध्ये मागील सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने व पिक परीस्थिती चांगली असलेने शेतकरी वर्गामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

तालुक्यामध्ये एकुण खरीपाचे २०८९६.४२ हे. इतके सर्वसाधारण क्षेत्र असुन सद्यस्थितीत २१२१४.१० हे. वर पेरणी पूर्ण झालेली आहे. तालुक्यामध्ये १०१.५२% टक्के क्षेत्रावर खरीपाची पेरणी ऊस क्षेत्र वगळुन पूर्ण झालेली आहे. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन १०६४३ हे., घेवडा ९४१२ हे., वाटाणा ९१७ हे.

इ. मुख्य पिकांचा समावेश आहे.

तालुक्यामध्ये बियाणे उगवणीबाबत शेतकयांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत तसेच रासायनिक खतांची पुरेशा प्रमाणात उपलब्धता असल्याने एक महिण्यानंतर खताच्या दुसया हप्त्यासाठी शेतक-यांना कोणतीही अडचण येणार नाही. याचे नियोजन तालुका कृषि अधिकारी कार्यालय कोरेगांव मार्फत करणेत येत आहे. या कार्यालयामार्फत किड व रोग सल्ला प्रकल्प अंतर्गत सोयाबीन, ऊस, मका इ. पिकांचे सर्वेक्षण दर आठवडयात नियमितपणे करण्यात येत असुन किड आर्थिक नुकसान पातळीचे वर गेलेस उपाययोजना राबविणेबाबत मार्गदर्शन करणेत येत आहे. गतवर्षी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत तालुक्यामध्ये ११३७८ लाभाथ्यर्थ्यांना ५.८६ कोटी इतक्या नुकसानीच्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे. चालु वर्षात आजअखेर २७१३९ इतक्या शेतकयांनी या योजनेत भाग घेतला असुन सदर योजनेची मुदत दि. ३१ जुलै २०२४ अखेर वाढविणेत आलेली आहे. तरी जास्तीत जास्त शेतक यांनी आपल्या पिकाचा मात्र १ रुपयामध्ये पीक विमा उतरवणेबाबत आवाहन करणेत येत आहे. सद्यस्थितीत प्रधानमंत्री पिक विमा योजना, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया योजना, खरीप हंगाम पिक स्पर्धा, कृषि यांत्रिकीकरण, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना तसेच मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना वैयक्तीक शेततळे इत्यादि योजनांचे ऑनलाईन अर्ज भरणे सुरु आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत बांबू लागवड व फळबाग लागवड इ. योजनेत शेतक-यांनी आपला सहभाग नोंदविणेबाबत कोरेगाव तालुका कृषी विभागाच्यावतीने आवाहन करणेत येत आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी कोरेगाव मुख्याधिकार्यांची घर टू घर संवाद मोहीम

कोरेगाव : राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कोरेगावच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायत प्रशासनाने घर तू घर भेट देऊन महिलांशी संवाद मोहीम सुरु करून महिलांना योजनेची सविस्तर माहिती दिली.

राज्य सरकारच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेतून महिलांना जुलैपासून महिन्याला दीड हजार रुपये अनुदान रुपी आर्थिक मदतच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे. दिनांक १५ ऑगस्ट पासून बँक खात्यावर जमा होणारी मदत जुलै पासूनची असणार आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांना व्हावा यासाठी कोरेगावातील बहुसंख्य परिसरातील घराघरात जाऊन मुख्याधिकारी श्रीमती विजया गाडगे, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक अर्ज सोबत जोडायचे दाखले कागदपत्रे याबाबत सर्व माहिती दिली व जे कागदपत्र उपलब्ध नसतील ती कशी उपलब्ध करावीत याबाबत मार्गदर्शन करून महिलांशी संवाद साधला.

अतिवृष्टीने जोर खोऱ्याचा वाई तालुक्यातील संपर्क तुटला

रस्ते शेती गेली वाहून जनजीवन विस्कळीत

सातारा : मागील काही दिवसात जोर खोऱ्यात झालेल्या अतिवृष्टीने रस्ते, शेती वाहून गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाई तालुक्याचा जनसंपर्क तुटला आहे. जोर गोळेवाडी जाधव वस्ती व इतर पश्चिम भागातील रस्त्यांची अवस्था फार भयावह झाली आहे. आमदार मकरंद पाटील यांनी सर्व यंत्रणांना परिस्थिती हाताळण्याच्या सूचना दिल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाकडून भर पावसात युद्धपातळीवर रस्ते दुरुस्तीला सुरवात झाली आहे.

मागील काही दिवसात झालेल्या जोरदार अतिवृष्टीने जोर खोऱ्यातील अतिवृष्टीने रस्ते वाहून गेले. जनजीवन विस्कळीत झाले. रस्ते भात, नाचणीची शेतेही वाहून गेली. यामुळे या परिसराचा वाई तालुक्याचा जनसंपर्क तुटला. सार्वजनिक बांधकाम आणि

जलसंपदा विभागाकडून भर पावसात युद्धपातळीवर मोठ मोठ्या यंत्रसामुग्री व्दारे रस्ते दुरुस्तीला सुरवात केली आहे.

मुसळधार पावसामुळे जोर गोळेवाडी जाधव वस्ती व इतर पश्चिम भागातील रस्त्यांची अवस्था फार भयावह झाली आहे. काही घरांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे या भागाचा वाई तालुक्यातील संपर्क तुटलेला आहे.

आमदार मकरंद पाटील प्रांताधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार सोनाली मेटकरी, गटविकास अधिकारी विजय परीट, आरोग्य अधिकारी संदीप यादव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे महेश गोंजारी व जलसंपदा विभागाला ताबडतोबिने परिस्थिती नियंत्रणात आणण्याच्या सूचना दिल्या आहेत. तात्काळ या गावांचा वाई तालुक्याशी संपर्क जोडून देण्याची सूचना केल्या आहेत. आमदार पाटील रविवारी या भागाचा दौरा करणार आहेत. जोर गोळेवाडी जाधव वस्ती व इतर संपर्क तुटलेल्या पश्चिम भागातील रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी पुणे येथील सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंत्यांची व मुंबई येथे या विभागाच्या सचिवांची रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी निधी उपलब्ध होण्यासाठी आमदार मकरंद पाटील यांनी शुक्रवारी भेट घेऊन चर्चा केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता महेश गोंजारी व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी युद्ध पातळीवर संपर्क प्रस्थापित करण्यासाठी काम सुरू आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार
आता हवा
बदल नवा
भोसरी विधानसभा लक्ष्य २०२४
मा.श्री.अजितभाऊ गव्हाणे
नगरसेवक : पिं.चिं. मनपा, सदस्य पुणे महानगर नियोजन समिती मा. स्थायी समिती अध्यक्ष पिं.चिं.
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.!
Content Factory